● रविवार, दि. १० नोव्हेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १०६ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### कुचेंच्या पायाखालची वाळू सरकली... निवडणुकीत पराभव दृष्टिपथात असल्याने थेट संपादकांनाच करताहेत विनवण्या

# सकारात्मक बातम्या छापल्या नाही तरी चालतील म्हणे विरोधात छापू नका

**दीपक शेळके**

**जालना -** विधानसभा निवडणुकांच्या प्रचारात सर्वच उमेदवारांनी आता आघाडी घेतली असून विविध राजकीय पक्षासह अपक्षही आपला जोर लावतांना दिसून येत आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्ष व शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी कॉँग्रेस (अजित पवार) यांच्या महायुतीला राज्यातील जनतेने नाकारले होते. ४८ जागांपैकी केवळ १८ जागीच महायुतीचे उमेदवार विजयी होऊ शकले होते. भाजपाची तर लोकसभा निवडणुकीत पुरती वाताहात झाली होती. त्याचीच पुनरावृत्ती ही विधानसभा निवडणुकीत होणार असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे. याशिवाय विविध संस्थांनी केलेल्या सर्वेच्या रिपोर्टनुसारही महायुतीच्या उमेदवारांना राज्यात फटका बसण्याची शक्यता वर्तविली आहे.



जालना जिल्ह्यातील पाचही विधानसभा मतदार संघाचा विचार केला गेल्यास जालना विधानसभा मतदार संघातून महायुतीचे उमेदवार अर्जुनराव खोतकर तर महाविकास आघाडीकडून कैलास गोरंट्याल हे रिंगणात आहेत. तर येथील वंचित बहुजन आघाडीचे डेव्हीड घुमारे व अपक्ष उमेदवार अब्दुल हाफिज हे प्रचारात सध्या आघाडीवर आहेत. येथे एकूण २६ उमेदवार आपले नशिब आजमावत आहेत.

परतूर विधानसभा मतदार संघात महायुतीचे बबनराव लोणीकर, महाविकास आघाडीकडून आसाराम बोराडे (ए.जे. बोराडे), तर अपक्ष उमेदवार असलेले सुरेशकुमार जेथलिया यांनी प्रचारात जोर लावला आहे. परतुरात एकूण अकरा उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

घनसावंगी विधानसभा मतदार संघात महाविकास आघाडीकडुन राजेश टोपे, महायुतीकडुन हिकमत उढाण, अपक्ष लढत असलेले सतीश घाटगे, शिवाजी चोथे व ॲड. भास्कर मगरे गाव-गाव पिंजून काढत आहेत. येथे एकूण २३ उमेदवार आहेत. बदनापूर मतदार संघात महायुतीकडुन नारायण कुचे, महाविकास आघाडीकडुन बबलू चौधरी, महाराष्ट्र स्वराज पक्षाचे उमेदवार जयश्री कटके, यांनी प्रचारात आघाडी घेतली आहे. याठिकाणाहून एकूण १७ उमेदवार निवडणूकीच्या रणांगणात आहेत. तर भोकरदन मतदार संघात सर्वाधिक ३२ उमेदवार निवडणुक रिंगणात असून त्यात महायुतीकडुन संतोष दानवे, महाविकास आघाडीकडुन चंद्रकांत दानवे, वंचित बहुजन आघाडीकडुन दीपक बोऱ्हाडे यांच्याकडुन प्रचारात जोर लावला जात आहे.

एकंदरीत जिल्ह्यातील सर्वच मतदार संघाचा विचार करता यापुर्वी जालना कॉँग्रसकडे, घनसावंगी राष्ट्रवादी कॉँग्रेस, तर बदनापूर, परतूर, भोकरदन मतदार संघात भाजपाचे आमदार आहेत.

येत्या २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून २३ रोजी मतमोजणी होणार आहे. राजकीय पक्षांच्या उमेदवारासह यावेळी अपक्ष उमेदवारही आपला दमखम दाखवित आहेत.

बदनापूर मतदार संघ हा तसा शिवसेनेचा बालेकिल्ला राहिलेला आहे. मात्र, मोदी लाटेत याठिकाणी १७ दिवसात आमदार होण्याचे भाग्य भाजपाच्या नारायण कुचेंना लाभले. २०१४ मध्ये कुचे हे २३ हजार ४९५ मतांच्या फरकाने निवडून आले होते. त्यांनी एनसीपीचे रुपकुमार (बबलू) चौधरी यांचा पराभव केला होता. त्यांनतर २०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत १८६१२ मतांच्या फरकाने पुन्हा श्री चौधरी यांचाच पराभव करत कुचे दुसऱ्यांदा आमदार झाले.





**रात्री उशिरापर्यंत आ. नारायण कुचे यांच्या कार्यालयावर खाने-पिणे सुरु असल्यामुळे या ठिकाणी काही आप-आपसात वाद होण्याची शक्यता आहे. या गंभीर बाबीकडे निवडणुक आयोगाने लक्ष देण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे. दुसऱ्या छायाचित्रात एक पत्रकार (तोंड पांढरे केलेले) नारायण कुचे यांच्याशी रात्री अकरा वाजता हितगुज करतांना.**

मात्र, गेल्या दहा वर्षांच्या कार्यकाळात बदनापूर मतदार संघाचा विकास करण्यात ते चौफेर अपयशी ठरले असल्याचे मतदार संघात बोलल्या जात आहे. गेल्या तीन निवडणुका लढलेले रुपकुमार (बबलु) चौधरी यांच्याबाबत या मतदार संघात आता सहानभुती निर्माण होतांना दिसून येत आहेत. त्यातच २००९ च्या विधानसभा निवडणुकीत ५६२४२ मते घेऊन विजयी झालेले संतोष सांबरे हे महाविकास आघाडीत शिवसेना (उद्धव ठाकरे) आहेत. त्यामुळे बबलू चौधरी यांचे पारडे यंदाच्या निवडणुकी जड मानले जात आहे.

नारायण कुचे यांनी ओबीसी आंदोलनादरम्यान गाड्या पुरविल्या असल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात आला होता. ते मराठा विरोधी असल्याची भावनाही मध्यंतरी निर्माण झाली होती. मराठा आंदोलनादरम्यान नारायण कुचेंना अनेक गावातून हाकलून लावल्याचे व्हिडीओही त्यावेळी व्हायरल झाले होते. या सर्व बाबींचा विचार करता मराठा समाजाचे एकगठ्ठा मतदान बबलू चौधरी यांना झाल्यास त्यांना विजयापासून रोखता येणार नसल्याचेही राजकीय जाणकार सांगताहेत. असे असले तरी २० नोव्हेंबर रोजी मतदानाच्या दिवशी बदनापूर मतदार संघातील जनता नेमके कोणत्या उमेदवाराचे बटन दाबते हे २३ नोव्हेंबरला कळेलच.

## सकारात्मक बातम्या छापल्या नाही तरी चालतील पण विरोधात छापू नका - कुचे

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने सर्वच राजकीय पक्षांनी प्रचारात आघाडी घेतली आहे. बदनापूर विधानसभा मतदार संघाचे महायुती भारतीय जनता पक्षाचे उमेदवार यांनी जालना जिल्ह्यातील काही वृत्तपत्राच्या थेट संपादकांनाच सकारात्मक बातम्या छापल्या नाही तरी चालतील पण विरोधात छापू नका असे म्हंटल्याने या निवडणुकीत नारायण कुचे यांच्या पायाखालची वाळू सरकली असल्याचे दिसून येत आहे. नारायण कुचे यांच्याकडुन काही स्थानिक वृत्तपत्रांतील बदनापूर मधील पत्रकारांसह इलेक्ट्रॉनिक मिडीया मधील दोन-चार पत्रकारांना हाताशी धरून मिडीया मॅनेज करत असल्याची माहिती असून हे हे पत्रकार म्हणवणारे दलाल सायंकाळ पासून रात्रीपर्यंत बदनापूर येथील नारायण कुचे यांच्या ऑफीसवर बसून असतात. याच ठिकाणी त्यांचे खाने-पिणे सुरु असते. महत्त्वाची बाब म्हणजे यात विभागीय वृत्तपत्रातील तसेच मोठ्या चॅनलमधील पत्रकार असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. याबाबत संबंधीत वृत्तपत्राच्या संपादकास विचारले असता त्यांनी यास दुजोरा दिला असून मतदार संघातील चर्चा तेथील परिस्थिती व वास्तव हे लिहिण्याचा आपला अधिकार असून हे लिहीणे म्हणजे कुणाला विरोध नसल्याचे ते म्हणाले. आणि सकारात्मक म्हणजे काय? असा प्रश्न उपस्थित करत जर रस्त्याचे काम बोगस झाले असले त्यास बोगस म्हणणे विरोध; हे कसे म्हणता येईल?

## निवडणुक आयोग करतंय काय?

बदनापूर मतदार संघाचे उमेदवार नारायण कुचे यांच्या कार्यालयावर दारूच्या बाटल्या आणि जेवनावर बेदिक्त ताव मारल्या जात आहे. दारू आणि जेवनाचे अमिष दाखवून मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न सुरु आहे. ही बाब निवडणुक आयोगाच्या निदर्शनास कशी येत नाही. हा प्रश्न उपस्थित होतो आहे. रात्री एक ते दोन वाजेपर्यंत हा प्रोग्राम मोठ्या दिमाखात सुरु असतो. आणि या प्रोग्राममध्ये पत्रकार म्हणवणारे काही दलालांचा सुद्धा समावेश आहे आणि कदाचित त्याचमुळे याबाबींपासून निवडणूक आयोग अनभिज्ञ आहे. या गंभीर विषयाकडे निवडणुक आयोगाने लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.

## त्या पत्रकारांवर नारायण कुचेंना निवडून आणण्याची जबाबदारी?

बदनापूर मतदार संघातील भारतीय जनता पक्षाचे उमेदवार नारायण कुचे यांच्या पक्ष कार्यालयावर काही पत्रकारांनी आपला मुक्काम वाढविला आहे. रात्री बे रात्री खाण्या-पिण्यासह उमेदवार नारायण कुचे व त्यांचे पीए यांच्याशी त्यांची हितगुज म्हणजेच चर्चा सुरु असते. रात्री बे रात्री हे पत्रकार या ठिकाणी नेमके काय करतात? असा प्रश्न उपस्थित होत असून त्यांच्या वरिष्ठांनी त्यांना काय नारायण कुचे यांना निवडून आणण्याची जबाबदारी दिली असल्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# जवाहर नवोदय विद्यालयाच्या प्रवेश परीक्षेसाठी अर्ज करण्यास मुदतवाढ

**जालना । प्रतिनिधी -** जवाहर नवोदय विद्यालयातील वर्ग नववी व अकरावीसाठी प्रवेश परीक्षा शनिवार दि.२५ फेब्रुवारी, २०२५ रोजी आयोजित करण्यात आली आहे. जालना जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या व इयत्ता आठवीच्या वर्गात २०२४-२५ या वर्षात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी सेवा केंद्रावरुन किंवा इतर ठिकाणावरुन ऑनलाईन अर्ज https://cbseitms.nic.in/ या संकेतस्थळावर सादर करण्यास मुदतवाढ मिळाली असून अर्ज मंगळवार दि.१९ नोव्हेंबर २०२४ पर्यंत सादर करता येतील, अशी माहिती अंबा-परतूर जवाहर नवोदय विद्यालयाचे प्राचार्य एस.जी. पवार यांनी दिली आहे.

जवाहर नवोदय विद्यालय निवड चाचणी-२०२५ लॅटरल इंन्ट्रीसाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्यासाठी प्रमाणपत्र, छायाचित्र, स्वाक्षरी १० ते १०० केबीमध्ये स्कॅन करुन भरावेत. विद्यार्थ्यांचा जन्म दि. १ मे, २०१० ते ३१ जुलै, २०१२ या कालावधीत झालेला असावा. तरी जिल्ह्यातील मुख्याध्यापकांनी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचे जवाहर नवोदय विद्यालयाच्या प्रवेशासाठी अर्ज वेळेत भरावेत. असेही कळविले आहे.

### विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४

# विधानसभा मतदारसंघासाठी मतदान यंत्राची पहिली पुरवणी सरमिसळ

**जालना । प्रतिनिधी -** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रमानुसार जालना जिल्ह्यातील ९९- परतूर, १००-घनसावंगी, १०१-जालना, १०२- बदनापूर (अ.जा.) आणि १०३-भोकरदन या चार विधानसभा मतदारसंघात बुधवार, दि. २० नोव्हेंबर, २०२४ रोजी मतदान होणार आहे. याकरिता भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानूसार मतदान यंत्राची पहिली पुरवणी सरमिसळ (सप्लिमेंटरी रॅण्डमायझेशन) प्रक्रिया जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या उपस्थितीत शनिवार दि.९ नोव्हेंबर, २०२४ रोजी सकाळी १० वाजता पार पडली.

यावेळी विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसह उपजिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी रविंद्र पडूळकर यांची उपस्थिती होती.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीत उमेदवारांच्या संख्येनूसार बॅलेट युनिटची संख्या वाढली आहे. यात १६ पेक्षा जास्त उमेदवार असल्यास



२ बॅलेट युनिट तर ३२ पेक्षा जास्त उमेदवार असल्याने ३ बॅलेट युनिट लागणार आहेत. यामध्ये ९९-परतूर विधानसभा मतदार संघ वगळता १००-घनसावंगी विधानसभा मतदार संघात २३ उमेदवार **पान २ वर**

## आमचे तेरावे वशंज वाचले, आमची इज्जत राहिली- अजित पवार

**सातारा -** येथे जाहीर सभेत बोलत असताना अजित पवार म्हणार्ले ४०० पारची घोषणा आणि संविधान बदलण्याच्या चर्चेमुळे मागासवर्गीय समाजाने महायुतीपासून पाठ फिरवली, अल्पसंख्याक समाजाला भीती दाखवली गेली. आदिवासी समाजालाही आरक्षण संपण्याची भीती दाखवली गेली. आम्ही आमदारांना सांगितले की, देशाच्या राष्ट्रपती द्रौपद मुर्मू या आदिवासी समाजाच्या आहेत, हे लोकांना सांगा. पण विरोधक म्हणाले की, राष्ट्रपतींनाच संसदेच्या उद्घटानाला बोलावले नाही. विरोधकांनी कुठून कुठून मुद्दे काढले. आमची वाटच लावली. बारामतीत वाट लागली. माढ्यात वाट लागली, असे सांगून अजित पवार यांनी साताऱ्याचा किस्सा सांगितला. अजित पवार म्हणाले, साताऱ्यात तर पिपाणीने वाचविले. तुतारीसारखी पिपाणी दिसली, ३५ ते ४० हजार मते पिपाणीला मिळाले. आमचा राजा वाचला बाबा. तेरावे वशंज आमचे वाचले. त्यामुळे काहीतरी आमची थोडीफार इज्जत राहिली.

# ‘ये पब्लिक है... ये सब जानती है... पब्लिक है...’

## सुरेशकुमार जेथलियांची ही कोणती एकनिष्ठता?; परतुरात चर्चेला उधाण



**परतूर । प्रतिनिधी -** शिवसेना पक्षाशी बंडखोरी करत २००९ च्या विधानसभा निवडणुकीत अपक्ष म्हणून सुरेशकुमार जेथलिया यांनी बाजी मारली होती. मात्र, त्यानंतर त्यांनी कॉँग्रेस पक्षात प्रवेश केला. कधी शिवसेनेत तर कधी कॉँग्रेसमध्ये असा त्यांचा प्रवास असून जेथे गेले तेथे बंडखोरी केली असल्याने ही कसली एकनिष्ठता असा प्रश्न परतुर मतदार संघातील मतदार विचारत आहेत. केवळ स्वतःच्या स्वार्थासाठी एका पक्षातून दुसऱ्या पक्षात आणि नंतर उमेदवारी मिळाली नाही तर बंडखोरी करत अपक्ष उमेदवारी दाखल करायची आणि लोकांना भावनिक साद घालायची ही जेथलियांची खेळी परतूर करांनी ओळखली असून २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत भावनिक मुद्दा चालणार नसल्याचे मतदारांच्या चर्चेतून दिसून येत आहे. सर्व काही स्वार्थासाठी सुरु असून ‘ये पब्लिक है... ये सब जानती है... पब्लिक है...’ हे १९७४ साली प्रदर्शित झालेल्या रोटी चित्रपटातील गाजलेले गाणे सहजच परतूरकरांच्या ओठावर येत आहे.

परतूर विधानसभा मतदार संघातून माजी आमदार सुरेशकुमार जेथलिया यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. कॉँग्रेसकडून उमेदवारी न मिळाल्याने कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर आपण निवडणुकीच्या रिंगणात उतरल्याचे श्री जेथलिया प्रचारादरम्यान सांगत आहे. असे असले तरी २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात झालेल्या राजकीय भुकंपानंतर महाविकास आघाडी उद्यास आली. आणि त्यानंतर शिवसेना पक्ष फोडून बंडखोरांनी भाजपासोबत राज्यात सत्ता स्थापन केली. मुळात शिवसेना (शिंदे गट) आणि भाजपाची ही महायुती जनतेला रुचली नसल्याचे नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर स्पष्ट झाले. आणि या निकालाची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून महायुतीकडून सध्या जोरदार प्रयत्न सुरु आहे. त्यातच महाविकास आघाडीला सत्तेतून अचानक आणि मध्यातच पायउतार व्हावे लागले. या महायुतीत शिवसेना (उद्धव ठाकरे) राष्ट्रवादी कॉँग्रेस (शरद पवार), कॉँग्रेस आणि इतर पक्षाचा समावेश आहे. विधानसभा निवडणुकीत **पान २ वर**

## संपादकीय पान

# मुलांनो मैदानात या...

आजचे युग हे विज्ञान तंत्रज्ञानाचे युग समजले जाते. २१ व्या शतकातील या विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात स्मार्ट फोन, इंटरनेट हे प्रत्येकाच्या जीवनातील अविभाज्य घटक बनले आहेत. केवळ घरातील मोठ्या माणसंकडेच नव्हे तर शाळकरी मुलांकडे देखील मोबाईल फोन पाहायला मिळत आहे. कोरोना काळात ऑनलाइन शिक्षणासाठी पालकांनी घेऊन दिलेला मोबाईल अजूनही मुलांच्या हातात आहे. हाच मोबाईल आज मुलांचा सर्वात जवळचा सहकारी बनला आहे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत मुले मोबाईललाच चिकटून बसलेली असतात. आजच्या विज्ञान तंत्रज्ञान युगात मोबाईल हा गरजेचा आहे. तो गरजेपुरातच वापरला गेला पाहिजे मात्र आज मुलांसाठी मोबाईल हेच सर्वस्व होऊन बसले आहे. आजच्या मुलांना मोबाईलने भुरळ घातली आहे. दिवसातील पाच ते दहा तास मुले मोबाईल वरच असल्याने मुलांची शारीरिक व बौद्धिक वाढ खुंटत चालली आहे त्यामुळे मुलांचे बालपण हरवत चालले की काय अशी शंका मनात येते. आजची मुले जास्त प्रमाणात टीव्ही, संगणक, मोबाईल, इंटरनेट, व्हिडीओ गेम, व्हाट्सएप, फेसबुक, इंस्टाग्राम यासारख्या सोशल मीडियात दंग असतात. तंत्रज्ञानरुपी राक्षसानं मुलांचं बालपणच खाऊन टाकलंय. पूर्वी शाळांना सुट्ट्या लागल्या की गावागावातील मैदाने मुलांनी भरून गेलेली असायची पण आज ती मैदाने विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात ओस पडली असल्याचे चित्र पाहायला मिळते. क्रिकेट वगळता एकही मैदानी खेळ खेळताना मुले दिसत नाहीत. देशी खेळ तर आजच्या मुलांना माहीतच नाहीत. गोट्या भोवरे विटीदांडू खेळताना कोणी दिसत नाही. आट्यापाट्या आणि सुरपारंब्या या खेळाचे नियम तर सोडाच पण नावही आजच्या मुलांना माहीत नाही. मोठे रिंगण घेऊन त्यात गोट्यांचा डाव लावल्याचे चित्र आज पाहायला मिळत नाही. गलगुट करून खेळणे व त्यावर राज्य द्यावे लागल्याचे हल्लीच्या मुलांमध्ये ऐकिवातही नाही. भोवऱ्याच्या रिंगणाचीही तीच अवस्था. दगडावर आरी घासून भोवऱ्याला टोक करीत बसलेला मुलगा शोधूनही सापडेनासा झाला आहे. जुन्या कपड्यांचा चेंडू तयार करून खेळला जाणारा रप्पाधप्पीचा खेळ हल्लीच्या मुलांना माहीतही नाही. लपंडाव, विटीदांडू,, लगोरी, कुरघोडी, चंपूल, उडाणटप्पू हे खेळ आता दुर्मिळ झाले आहेत. लंगडी हा खेळ आता फक्त शाळेतील पिटी च्या तासापूरता उरला आहे. या खेळांमुळे मुलांचा शारीरिक व्यायाम व्हायचा शिवाय संघभावना, एकी, आपुलकी, नेतृत्व हे गुण या खेळांमुळे मुलांमध्ये विकसित व्हायचे. या खेळाची जागा आता टीव्ही, संगणक, मोबाईल व्हिडीओ गेम यांनी घेतली आहे. टीव्ही, संगणक, व्हिडीओ गेममुळे मुलांना विविध खेळांची माहिती उपलब्ध होऊन त्यातून मुलांचा बौद्धिक विकास होतो असे वाटत असले तरी त्यांचा शारीरिक विकास खुंटत चालला आहे याचा समाजातील सर्व घटकांनी गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. मुलांना पुन्हा मैदानाकडे आणण्याची जबाबदारी पालक, शिक्षक व समाजातील सर्वच घटकांची आहे.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# निवडणूक विषयक राजकीय जाहिरातींचे पूर्व प्रमाणीकरण बंधनकारक

**जालना । प्रतिनिधी** - विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाने राजकीय जाहिरातींचे पूर्वप्रमाणीकरण करण्याचे निर्देश दिले आहे. जालना जिल्हा विधानसभा मतदारसंघासाठी जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण आणि संनियंत्रण समिती स्थापन करण्यात आली आहे. निवडणूक विषयक सर्व राजकीय जाहिरातींचे पूर्व प्रमाणीकरण करणे बंधनकारक आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात माध्यम कक्ष कार्यान्वित करण्यात आला असून, जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण कक्ष कार्यान्वीत करण्यात आला आहे. उमेदवार व राजकीय पक्षांनी आपल्या राजकीय जाहिरातीचे प्रमाणीकरण करून घेण्यासाठी आपले अर्ज दिलेल्या मुदतीत माध्यम कक्षातील माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समितीकडे सादर करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी श्री. पांचाळ यांनी केले आहे.

राष्ट्रीय पक्ष, उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी जाहिरात प्रसारित होण्याच्या तीन दिवस अगोदर जाहिरात प्रमाणीकरणासाठी जाहिरात व अर्ज सादर करणे आवश्यक आहे. तर अनोंदणीकृत राजकीय पक्ष किंवा इतर व्यक्तींनी किमान सात दिवसापूर्वी समितीकडे अर्ज करणे आवश्यक आहे. माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समिती अर्थात एम.सी.एम.सी. समिती ही अर्ज प्राप्त झाल्यानंतर तो अर्ज ४८ तासात निकाली काढेल. जाहिरात नियम ानुसार नसल्याचे समितीला आढळून आल्यास एम.सी.एम.सी. समितीला जाहिरात प्रमाणिकरण नाकारण्याचा अधिकार आहे. समितीच्या निर्णया विरुद्ध राज्य समितीकडे अपील करता येते. मात्र त्यानंतर केवळ सर्वोच्च न्यायालयात दाद मागता येईल. समितीने जाहिरातीत बदल सुचविल्यानंतर समितीकडून तसा संदेश प्राप्त झाल्याच्या २४ तासात राजकीय पक्ष किंवा उमेदवाराने त्यानुसार दुरुस्त्या करून नवीन निर्मित केलेली जाहिरात प्रमाणीकरणासाठी सादर करणे आवश्यक आहे. राष्ट्रीय पक्ष, उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी जाहिरात प्रसारित होण्याच्या तीन दिवस अगोदर जाहिरात प्रमाणीकरणासाठी जाहिरात व अर्ज सादर करणे आवश्यक आहे. तर अनोंदणीकृत राजकीय पक्ष किंवा इतर व्यक्तींनी किमान सात दिवसापूर्वी समितीकडे अर्ज करणे आवश्यक आहे. जाहिरात नियम ानुसार नसल्याचे समितीला आढळून आल्यास एम.सी.एम.सी. समितीला जाहिरात प्रमाणिकरण नाकारण्याचा अधिकार आहे. समितीच्या निर्णया विरुद्ध राज्य समितीकडे अपील करता येते. मात्र त्यानंतर केवळ सर्वोच्च न्यायालयात दाद मागता येईल. समितीने जाहिरातीत बदल सुचविल्यानंतर समितीकडून तसा संदेश प्राप्त झाल्याच्या २४ तासात राजकीय पक्ष किंवा उमेदवाराने त्यानुसार दुरुस्त्या करून नवीन निर्मित केलेली जाहिरात प्रमाणीकरणासाठी सादर करणे आवश्यक आहे. जाहिरात प्रमाणीकरणासाठीचा अर्ज हा विहित नमुन्यात समितीकडे सादर करणे आवश्यक आहे. अर्जामध्ये अर्जदाराचे नाव व पत्ता, उमेदवार किंवा पक्षाचे नाव किंवा सदर जाहिरात एखादी संस्था - ट्रस्ट- संघटना यांच्याकडून दिली जात असल्यास त्यांचे नाव, मतदारसंघाचे नाव, राजकीय पक्षाचे मुख्यालयाचा पत्ता, ज्या चॅनल / केबल नेटवर्कवर जाहिरात प्रसारित करायची आहे, त्याबाबत स्पष्ट माहिती कोणत्या उमेदवाराच्या हितासाठी सदर जाहिरात करण्यात आली आहे, त्याबाबत माहिती, जाहिरात सादर करण्यात येत असल्याची दिनांक, जाहिरातीसाठी वापरण्यात आलेली भाषा, त्याच्या संहिता लेखनाच्या (ट्रास्कींनप) साक्षांकित दोन प्रती, जाहिरातीचे शिर्षक, जाहिरात निर्मितीचा खर्च, जाहिरात जर चॅनेलद्वारे प्रसारित केली जात असेल तर किती वेळा ती प्रसारित केली जाणार आहे, त्याचे प्रस्तावित केलेले दर, त्यासाठी लागलेला एकूण खर्च आदी सविस्तर माहिती अर्जदाराने निवडणूक आयोगाने दिलेल्या विहित नमून्यात स्वाक्षरीसह सादर करणे आवश्यक आहे. आदर्श आचारसंहितेनुसार दिलेल्या निर्देशाचे जाहिरातीमध्ये पालन होणे आवश्यक आहे. यात प्रामुख्याने राष्ट्रीय एकात्मतेला हानी पोहोचविणाऱ्या बाबी, धार्मिक भावना दुखावणे, भारतीय घटनेचा अवमान करणे, गुन्हा दाखल करण्यास प्रवृत्त करणे, कायदा व सुव्यवस्थेस बाधा निर्माण करणे, गुन्हेगारीचे उदात्तीकरण, महिलांचे चुकीचे चित्रण, तंबाखूजन्य किंवा नशा आणणाऱ्या पदार्थाच्या जाहिराती, हुंडा, बालविवाह यांना उत्तेजन देणाऱ्या जाहिराती प्रसारित करण्यास प्रतिबंध आहे. इतर देशावर टिका नसावी. न्यायालयाचा अवमान जाहिरातीतून होता कामा नये. राष्ट्रपती व न्याय संस्था यांच्याबाबत साशंकता नसावी. राष्ट्रीय एकात्मतेला, सौहार्दतेला आणि एकतेला बाधा पोहचविणारा मजकूर त्यामध्ये नसावा. सुरक्षा दलातील कोणतेही सैनिक, व्यक्ती, अधिकारी यांची अथवा सैन्य दलाचे छायाचित्र जाहिरातीत नसावे. कोणत्याही व्यक्तीच्या खाजगी / वैयक्तिक जीवनातील घटनांना धरुन त्यावर भाष्य नसावे. व्हिडीओ व्हॅनद्वारे प्रचारासाठी उपयोगात आणल्या जाणाऱ्या जाहिराती माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समितीकडून प्रमाणित करुन घेणे आवश्यक आहे. या वाहनाची निवडणूक विभागाकडून रितसर परवानगी घेणे आवश्यक आहे. एखाद्या व्यक्तीला उमेदवार किंवा राजकीय पक्ष यांच्या संमती शिवाय प्रचार करणाऱ्या जाहिराती देता येणार नाहीत. अनुमती शिवाय जाहिराती प्रकाशित झाल्यास प्रकाशकावर गुन्हा दाखल करण्यात येईल. मतदानाच्या दिवशी व मतदानाच्या एक दिवस अगोदर मुद्रीत माध्यमाद्वारे प्रकाशित करावयाची जाहिरात प्रमाणीकरणसाठी समितीकडे दोन दिवस आधी जाहिरातीसह अर्ज सादर करणे आवश्यक असल्याचेही जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी तथा समिती अध्यक्ष डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी कळविलेआहे.

# शिंदेच्या शिवसेनेतून जिल्हाप्रमुख मोहन अग्रवाल यांची हकालपट्टी



**परतूर । प्रतिनिधी** - शिंदे सेनेचे जिल्हाप्रमुख मोहन अग्रवाल यांची शिंदे सेनेकडुण पक्षाने समितीच्या शिफारशी
यांची दि.८ नोव्हेंबर शुक्रवार रोजी शिवसेनेतून हकालपट्टी करण्यात आली. विधानसभा निवडणुकीच्या धामधुमीत हकालपट्टी करण्यात आल्याने शिंदेच्या शिवसेनेत खळबळ उडाली आहे. परतूर मंठा विधानसभा मतदारसंघात निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मोहन अग्रवाल यांनी युतीधर्म मोडीत काढून स्वतःच्या पायावर दगड मारून घेतला असे म्हणणे वावगे ठरणार नाही. याला कारण ही तसेच आहे युती धर्म मोडत काढून अपक्ष उमेदवारी अर्ज भरून युतीतील मित्र पक्षाला मदत न केल्याच्या आरोपावरून पक्षाने जालना जिल्हाप्रमुख मोहन अग्रवाल यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आलेली आहे शिवसेनेचे मुख्य नेते श्री एकनाथराव शिंदे यांच्या आदेशावरून पक्षविरोधी कार्यकर्त्याच्या आरोप केल्याच्या आरोपावरून शिस्तभंगाची कारवाई केली आहे सध्या सोशल मीडियाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर सर्व समाज नेटवर्क वर फिरत आहे त्यामुळे मोहन अग्रवाल यांच्या कार्यावर अनेक प्रश्न निर्माण होत आहेत शिंदे शिवसेना पक्षाच्या धोरणाच्या विरोधात काम केल्याने जिल्हाप्रमुख मोहन अग्रवाल यांची पक्षाने हकालपट्टी केली आहे.

## पान १ वरुन

### विधानसभा मतदारसंघासाठी ...

असल्याने ४२४ बॅलेट युनिट, ९ अतिरिक्त कंट्रोल युनिट आणि ९ अतिरिक्त व्हीव्हीपॅट वाटप करण्यात आले. तर १०१-जालना विधानसभा मतदार संघात २६ उमेदवार असल्याने ४०२ बॅलेट युनिट, ९ अतिरिक्त कंट्रोल युनिट आणि ९ अतिरिक्त व्हीव्हीपॅट वाटप करण्यात आले. तसेच १०२- बदनापूर (अ.जा.) विधानसभा मतदार संघात १७ उमेदवार असून ४४७ बॅलेट युनिट, ११ अतिरिक्त कंट्रोल युनिट आणि १० अतिरिक्त व्हीव्हीपॅट वाटप करण्यात आले. आणि १०३-भोकरदन विधानसभा मतदार संघात ३२ उमेदवार असल्याने ८०० बॅलेट युनिट, ९ अतिरिक्त कंट्रोल युनिट आणि ९ अतिरिक्त व्हीव्हीपॅट वाटप करण्यात आले. भोकरदन विधानसभा मतदार संघात नोटा वगळता ३२ उमेदवार असल्याने त्याठिकाणी ३ बॅलेट युनिट लागणार आहेत. आज राजकीय पक्षांचे प्रतिनिधी व उमेदवारांच्या प्रतिनिधी समक्ष पार पडलेल्या मतदान यंत्राची सरमिसळ प्रक्रियेनूसार जालना जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघात कोणत्या क्रमांकाचे ईव्हीएम यंत्र कोणत्या केंद्रावर जाणार याची निश्चिती झाली आहे.

### ये पब्लिक है ...

परतूर मतदार संघाची जागा ही महाविकास आघाडीत शिवसेना (उद्धव ठाकरे) यांच्याकडे गेली. परिणामी या ठिकाणी शिवसेनेने आसाराम बोराडे (ए.जे. बोराडे) यांना उमेदवारी दिली. जागा काँग्रेस पक्षाला सुटली नसल्याने सुरेशकुमार जेथलिया हे नाराज असल्याची चर्चा मतदार संघात होती. ते अपक्ष उमेदवारी दाखल करणार असल्याचेही बोलल्या गेले. त्यानंतर त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. मात्र, महाविकास आघाडीतील प्रमुख नेते हे त्यांची समजुत काढतील आणि ते उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी उमेदवारी अर्ज मागे घेतील असे वाटले मात्र, वरिष्ठ पातळीवरील सर्व आदेश धुडकावत सुरेशकुमार जेथलिया यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे न घेता अपक्ष निवडणुक लढविण्याचा निर्णय घेतला असला तरी हा निर्णय आता त्यांच्या अंगलट येण्याची शक्यता मतदार संघातील चर्चे वरून दिसून येते आहे. पक्षाने उमेदवारी दिली नाही म्हणून बंडखोरी करायची ही त्यांची जुनीच सवय असल्याचे आता बोलल्या जात असून आता पुढे ते कोणत्या पक्षात असतील यावरही मत-मतांतरे मतदारांकडून व्यक्त होत आहेत.

जो व्यक्ती स्वतःच्या पक्षाची एकनिष्ठ राहिला नाही तो परतुराती जनतेशी काय एकनिष्ठ राहील, पक्षाने त्यांच्यावर अन्याय केला असल्याचे जेथलिया हे ढोंग करीत आहेत. मतदार संघात भावनिक खेळी करुन ते मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करीत आहेत. मात्र, 'ये पब्लिक है... ये सब जानती है... पब्लिक है...' असा सूर परतूर मतदार संघातील मतदारांमधून निघत आहे.




### महायुतीचे उमेदवार अर्जुनराव खोतकर यांचा मतदार संघात डोअर टू डोअर प्रचारावर भर

# आमदार नसतांना केलेल्या कामांमुळे विरोधकांच्या तंबूत खबराहट

### आ. गोरंट्याल यांच्यावर श्री खोतकर यांची टिका







**जालना । प्रतिनिधी -** महायुतीचे (शिवसेना) अधिकृत उमेदवार अर्जुनराव खोतकर यांनी ग्रामीण भागासह शहरी भागात सुध्दा डोअर टू डोअर जाऊन प्रचाराचा धडाका लावला आहे. त्यामुळे सहाजिकच विरोधकांच्या तंबूत घबराहट पसली असून आपण सत्तेवर नसतांनाही ग्रामीण तसेच शहरी भागाचा विकास केला आहे, तर विरोधक मात्र टक्केवारी घेण्यात मशगुल असल्याची टिका श्री. खोतकर यांनी केली आहे.

जालना विधानसभा-१०१ मतदार संघातील सोमनाथ, राममुर्ती, जळगांव, सो. जळगांव तांडा, म जरेवाडी, सिंधी काळेगांव, आदी गावांना तसेच शहरातील विविध प्रभागांना श्री. खोतकर यांनी भेटी दिल्या.

श्री. खोतकर यांनी भेटी दिल्या. यावेळी गावकर्यांनी त्यांचे फटाके वाजवून जोरदार स्वागत केले. यावेळी बोलतांना श्री. खोतकर म्हणाले की, गेल्या अनेक वर्षापासून आपण समाजकारण आणि राजकारण करीत आहोत, परंतू विरोधकांसारखे घाणेरडे राजकारण कधीच पाहिले नाही. ज्या-ज्या पदावर काम करण्याची संधी मिळाली ते काम अत्यंत प्रामाणिकपणे करण्याचा प्रयत्न करण्यात आला. वैयक्तीक आरोग्य बील कमी करण्यासंदर्भात किंवा ॲडमीशन संदर्भात तसेच शेतकर्यांचा पीक विमा मिळवून देण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारची धरणे आंदोलन, मोर्चे, रास्ता राको अशा अनेक प्रकारचे आंदोलन उभा करुन न्याय मिळवुन देण्याचे काम केले आहे. कुडल्याही प्रकारची तक्रार असू द्या किंवा अडचण ती सोडवण्यासाठी आपण जनतेसाठी चोवीस तास उपलब्ध असतोत. अर्जुनराव खोतकर आणि त्यांच्या मित्र मंडळीनी डोअर टू डोअर जातांनाच वैयक्तीक भेटीवर भर दिला असल्याने त्यांचा विजय निश्चित मानण्यात येत आहे. याप्रसंगी शेतकरी, शेतमजूर, माता- भगिनी, विद्यार्थी, वाहनधारक, ड्रायव्हर व अन्य घटकातील समाजबांधवांसह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, युवा सेना, महिला आघाडी आदींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

राममूर्ती येथील सर्व म हापुरुषांच्या चरणी विनम्र अभिवादन करून लोकांशी संवाद साधला. याप्रसंगी श्री अर्जुन खोतकर यांनी विविध विषयांवर चर्चा केली तसेच जालना विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक ग्रामीण असो वा शहरी भागाचा विकास आराखड्याबद्दल ग्रामस्थांना माहिती दिली त्याचबरोबर आपण विशेष प्रयत्नाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे ३०० ते ४०० कोटी रुपये निधी हा जालना विधानसभा मतदारसंघाच्या विकास काम ासाठी आणला आहे व जालना विधानसभा मतदारसंघाततील प्रत्येक ठिकाणी सर्वांगीण विकास साधला व पुढील काळात आपण साधणार आहोत. जालना म तदारसंघाचा आमदार असताना मी रस्ते, पाणी पुरवठा, आरोग्य, रोजगार आणि वीज प्रत्येक गाव आणि शहरात आधुनिक सुविधा सुनिश्चित करण्यासाठी, प्रभावी योजनांची अंमलबजावणी केली. यामुळेच मला मतदारसंघातील जनतेचे प्रेम व आशीर्वाद लाभले ! भविष्यात जालना मतदार संघास समृद्ध आणि संपन्न बनविण्यासाठी मी विकास आराखडा बनविला आहे! पाच वर्षात थांबलेल्या विकासाची पोकळी भरून काढायची व जालना मतदारसंघास पुन्हा एकदा विकासाच्या नव्या उंचीवर न्यायचे असल्याचे श्री. खोतकर यांनी यावेळी आवर्जुन सांगितले. सोमनाथ, जळगांव तांडा, मजरेवाडी, सिंधी काळेगांव येथेही श्री. खोतकर यांचे जंगी स्वागत गावकर्यांनी केले.

**सोमनाथ जळगाव तांडा येथे काँग्रेसला खिंडार-**

अभिजीत राठोड (टायगर) यांच्या नेतृत्वात शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला यावेळी शिवसेना उपनेते तथा माजी राज्यमंत्री महायुतीचे अधिकृत उमेदवार अर्जुनराव खोतकर यांनी सर्वांना शिवसेना पक्ष प्रवेश केल्याबद्दल धन्यवाद दिले. आपण योग्य वेळी प्रवेश केल्यामुळे आपली ताकद आणखी मजबूत झाल्याचे श्री. खोतकर यांनी सांगितले. यावेळी अभिजीत राठोड (टायगर), राजू राठोड, भोपू राठोड, पृथ्वीराज राठोड, आकाश राठोड, ज्ञानेश्वर राठोड, करण राठोड, विकास राठोड, देवानंद चव्हाण, सुनील राठोड, संदीप चव्हाण, उमेश राठोड, अभिजीत चव्हाण, योगीराज राठोड, अक्षय राठोड, केवल राठोड, विराट राठोड, सोन्या राठोड, बाळू राठोड, अभिजीत चव्हाण,पवन राठोड, गजानन चव्हाण, बाळू राठोड, अविनाश सुराशे, स्वप्निल साळवे, विजय हवाले, ज्ञानेश्वर जाधव, आकाश जाधव, आदींनी शिवसेना पक्षात प्रवेश केला. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख भगवानराव आंबोरे युवा सेना तालुकाप्रमुख नागेश डवले कडूबा इंदलकर गावातील अशोक चव्हाण, राम राठोड, परमेश्वर शिंदे, ज्ञानेश्वर माऊली पडोळ, विठ्ठल एखंडे, राम एखंडे, सर्जेराव गायकवाड आदींची उपस्थिती होती.

**बिनबुडाचे आरोप!**

याच सभेदरम्यान श्री. खोतकर यांनी गोरंट्यालचा खरपूस समाचार घेतला. ते म्हणाले की, हा माणूस आपल्यावर नको ते खोटे नाटे आरोप करुन मते मिळविण्याचा प्रयत्न करत आहे. परंतू त्यांचा हा प्रयत्न मतदार नक्कीच हाणून पाडतील, असा विश्वास व्यक्त करुन खोतकर म्हणाले की, बिनबुडाचे आरोप आपल्याही करतात येतात. परंतू काही तरी पुरावा असल्याशिवाय आपण असे बिनबुडाचे आणि घाणेरडे आरोप करत नाहीत.

युवा आदर्श

## पैसा ...

निवडणूका तापलेल्या
मोकाट हिंडतो पैसा
विकत घ्यावे माणसा
उन्मत्त होतो काहीसा
व्यवहार करणा-यांना
गर्दीत मिळे आडोसा
विकला जातो मतदार
जरी अनाठाई भरोसा
लक्ष्मीदर्शन ज्या नाही
तेही टाकतात उसासा
खोकला होता असह्य
उबळ रोखे अडुळसा
नशेत विसराल वेदना
फुकटची दारू ढोसा
रिकाम्या पोटांनो चला
सामिष भोजनां ठोसा
मजूरी दिली ना कधी
भरगच्च ओझे खिशा
कोण पिणारं सांग बा
जरी चवगोड या विषा
चविष्ट मिठाई सजली
घोंगावत राहती माशा
जिंका एन केन प्रकारे
एकचं सगळ्यां धोशा
हिडीस पिडीस करता
बदलली माधुर्य भाषा
कोरू पाहतात सगळे
हातावरी सत्तेच्या रेषा
मोहांस पांघरे कितीही
लपली नसे अभिलाषा
साधे भोळे ते मतदाते
बळी पडतीलं आमिषा

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# विभागीय कॅरम स्पर्धेत, जेबीके विद्यालयाची विद्यार्थिनी अनुष्का कामे हिची राज्यस्तरावर निवड

**टेंभुर्णी -** तालुका जाफराबाद जिल्हा जालना येथील श्रीमती जे. बी. के. विद्यालय व नवभारत कनिष्ठ महाविद्यालय यशामध्ये मानाचा तुरा. वसमत येथे विभागीय स्तरावर पार पडलेल्या कॅरम स्पर्धेत. वयोगट १४ मधून *कु.अनुष्का कामे* हिची राज्यस्तरावर निवड. वयोगट १७ मधून *कु. भक्ती साळवे* हिची राज्यस्तरावर निवड. येत्या १२ तारखेला चंद्रपूर येथे होऊ घातलेल्या राज्यस्तरीय कॅरम स्पर्धेमध्ये. छत्रपती संभाजीनगर विभागाचे नेतृत्व. जे. बी .के. विद्यालयाच्या आपल्या लाडक्या विद्यार्थीनी करणार आहें. या सर्व यशस्वी विद्यार्थिनींचे क्रीडा विभाग प्रमुख कैलास भुतेकर, मार्गदर्शक राजेश शेवाळे , यांचे संस्थेचे अध्यक्ष संजय काबरा, संस्थेचे उपाध्यक्ष शेख जमीर, संस्थेचे सचिव सत्यनारायण सोनी, संस्थेचे कोषाध्यक्ष सुभाष राठी, सन्माननीय ज्येष्ठ संचालक रामनारायण काबरा, संस्थेचे जेष्ठ संचालक तथा माजी अध्यक्ष सुरेश शेठ काबरा, संस्थेचेसंचालक आता माझी सचिव प्रेमसुख काबरा, संचालक तथा माजी सचिव प्रल्हाद टेंभुर्णीकर, संस्थेचे संचालक राजीव काबरा, संस्थेचे संचालक दीपक काबरा, संस्थेचे संचालक मधुकरराव निकम, संस्थेचे संचालक विश्वनाथराव सांगोळे, संस्थेचे संचालक तथा उपप्राचार्य प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर, संस्थेचे संचालक प्रदीप मुळे, संस्थेचे संचालक प्रदीप काबरा, संस्थेचे सर्व विश्वस्त, प्राचार्य नंदकुमार काळे, पंजाबराव सोळंके, धनंजय पुराने, प्राध्यापक सुनील बनसोडे, प्राध्यापक अरुण आहेर, प्राध्यापक राम दास भांगे, प्राध्यापक कैलास जाधव, प्राध्यापक गजानन धोटे, प्राध्यापक डॉक्टर आनंद जाधव,




सखाराम बोरकर, विष्णू जाधव, रमेश इंगळे, रवींद्र मोरे, राजेंद्र जगताप, दिनकर उकर्डे दत्ता उकरडे, गणेशसंवसाक्के, वासुदेव क्षीरसागर, समाधान कांबळे, आवटी मॅडम, पाटील मॅडम भिलावेकर मॅडम, कळंबे मॅडम, शेख मॅडम, लंबे मॅडम,राजू डोम ळे, क्शश्रर्षिीश्र देशमुख दगडोबा तांबेकर, दीपक देशमुख, अनेक विद्यार्थ्यांनी या यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

पान १ वरुन

## महिला सुरक्षेसाठी ...

योजनेच्या माध्यमातून पात्र महिलांच्या खात्यावर ७५०० जमा झाले असून परतून विधानसभा मतदारसंघातील १ लाख १० हजार पेक्षा अधिक महिलांचा यामध्ये समावेश आहे म ाजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण जयंत पाटील यासारख्या म ातब्बर नेत्यांनी त्याचबरोबर काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या सर्व पक्षांनी या योजनेची खिल्ली उडवली आणि ही योजना बंद पडावी यासाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली व ही योजना बंद करावे अशी मागणी देखील केले त्यामुळे महिला सक्षमीकरणासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुढाकार घेतलेला असताना महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ होऊन मिळू नये यासाठी महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आणि पक्षातील सर्वांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत त्यामुळे म ाता भगिनी महाविकास आघाडीला नक्कीच त्यांची जागा दाखवतील असा विश्वास देखील यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केला.

महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आणि पक्षांनी कितीही आदळ आपण केली तरी लाडकी बहीण योजना कदापि बंद होणार नाही प्रति महिना १५०० रुपयाप्रमाणे आतापर्यंत म हिलांच्या खात्यात ७५०० रुपये जमा झालेले आहेत यासाठी राज्य सरकारने ४० हजार कोटी रुपयांची तरतूद केलेली असून जो जोपर्यंत भारतीय जनता पक्ष शिवसेना राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे सरकार सत्तेत आहे तोपर्यंत ही योजना बंद होणार नाही अशी ग्वाही देखील यावेळी आमदार लोणीकरांनी दिली.

# फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल अंतर्गत ७२ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न

**छत्रपती संभाजी नगर । प्रतिनिधी -** ऐक्याने वागल्यास भावी राजकारणआपली गुलामगिरी नाहीशी करील म्हणून सार्वजनिक एकजूट हवी. या ऐतिहासिक विधानाच्या वर्धापनदिनानिमि त्त ३ नोव्हेंबर २०२४ ला ७२ व्या वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी उद्घाटनपर म ार्गदर्शन करताना एड. विलास रामटेके म्हणाले की, अल्पसंख्याक लोकांनी त्यांच्या मूल्यवर्धित ज्ञानाच्या बळावर समाजात परिवर्तन घडवून आणल्याचा इतिहास उपलब्ध आहे. म्हणून आपण संख्येने कमी असलो तरी निराश होऊ नये. आपण भारताचे संविधानानुसार सम ाजाच्या पुनर्रचनेचे कार्य केले पाहिजे. राज्य नागनाथांचे आले काय किंवा सापनाथांचे आले काय? आपले मरण अटळ आहे. म्हणून आपण सार्वजनिक कार्यासाठी एकजूट केली पाहिजे.

याप्रसंगी सुभाष ठोकळ म्हणाले की, राजकीय सत्ता ही सर्व समस्यांची गुरूकिल्ली असल्याने छोट्या मोठ्या कार्यक्रमांतून सुद्धा आपण प्रबोधनाची मालिका निरंतरतेने राबविली पाहिजे. समाजाला न्याय देण्यासाठी आपण आपले प्रतिनिधी विधिमंडळात पाठविले पाहिजे. उद्योजक मिलिंद बागूल म्हणाले की, आपण समाज जीवनात समर्पित भावनेने दख्खलपात्र कार्य केले पाहिजे. प्रतीक पंचशील म्हणाले की सामाजिक, धार्मिक व राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते प्रतिस्पर्ध्यांना तोंड द्यायला असमर्थ ठरल्यास सरेंडर करतात. करिता जातीव्यवस्था नष्ट करून व्यक्तीला प्रतिष्ठा प्राप्त करून द्यावी लागेल. इंजिनिअर किशोर पाटील म्हणाले की, लाभार्थी सदरील विधानाचे मर्म समजू न शकल्याने चळवळीची, समाजाची वाताहात होत आहे. ब्राह्मण इतरांशी निघृण व निष्ठूरपणे वागत असल्याने आव सर्वांसाठी आणतात, मात्र त्यातून निघणारे लोणी स्वतः खातात आणि ताक इतरांना देतात.

याप्रसंगी प्रमुख वक्ते पीईएसआर महाविद्यालयाचे प्राचार्य दिलीप वर्घट म्हणाले की, केवळ ऐक्य झाल्याने गुलामगिरी नष्ट होईल असे मुळीच नाही तरीही एकसंघ होऊन उपाययोजना केल्या पाहिजेत. आपला शेजारी सुद्धा सोबत येईल याची साश्वती नसल्याने ऐक्य हे स्वप्न ठरत चालले आहे. काही सेवानिवृत्तांना लोक जयभीम सुद्धा करीत नसतात कारण त्यांनी आयुष्यात समाजासाठी फार काही योगदान दिले नसते. इतरांना ऐक्याच्या प्रक्रियेत आणण्यासाठी आपण त्यांचे म्हणणे समजून घेतले पाहिजे. बहुतांश वेळा जवळची माणसेच आपल्याशी शत्रु प्रमाणे वागत असतात.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फ ुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, समाजातील उच्च शिक्षितांनी समाजाला संघटीत करण्यासाठी संघर्ष केला पाहिजे. म्हणून आपण फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या माध्यमातून ऐकणा-यांमध्ये फुले शाहू आंबेडकर व्यक्त होण्याची क्षमता विकसित करण्यासाठी प्रयत्न करीत आहोत. ज्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ऐतिहासिक ८३२ शीर्षक उपलब्ध आहेत, ज्याचे प्रासंगिकतेनुसार वर्धापनदिन साजरे करून वर्तमानात आवश्यक संदेश प्रसारीत करून जनतेला समर्पक संदेश देण्यासाठी आटोकाट प्रयत्न सुरू आहेत. आपण शिकलो असलो तरी सुशिक्षित नाही याची जाणीव ठेवून कौटुंबिक ऐक्यातून सामाजिक ऐक्य घडवून आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. याप्रसंगी मी सर्व वर्तमानपत्राचे अभिनंदन करतो ज्यांनी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या बातम्या प्रकाशित केल्या आहेत.

या कार्यशाळेचे. सुत्रसंचालन विलास रामटेके यांनी केले. सुरूवातीला मान्यवरांचे हस्ते आदर्शांना पुष्पमाला अर्पण करण्यात आल्या. या कार्यशाळेला इंजिनिअर किशोर पाटील, बी. बी. मेश्राम, एड. विलास रामटेके, प्राचार्य दिलीप वर्घट, उद्योजक मिलिंद बागूल, राहूल मेश्राम, प्रतीक पंचशील, साधू आनंद इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते.

# सत्तेत आल्यास शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफीसह लाडक्या बहिणींना महिन्याला तीन हजार रुपये देणार

## नाना पटोले यांनी जालना येथील जाहिर सभेत दिले वचन;





**जालना । प्रतिनिधी -** विकासाचे गाजर दाखवून राज्यात सत्तेत आलेल्या महायुतीतील मंडळींनी महाराष्ट्र राज्याला केवळ लुटण्याचे काम केले आहे. राज्यातील प्रमुख उद्योग गुजरातला पळवून लावण्याचे पाप करणाऱ्या महायुती सरकारला या निवडणुकीत जनता निश्चितपणे घरचा रस्ता दाखविल्याशिवाय राहणार नाही असा ठाम विश्वास महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आ. नानाभाऊ पटोले यांनी येथे बोलतांनी व्यक्त केला. राज्यात सत्ता आल्यास शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफीसह लाडक्या बहिणींना ३ हजार रुपये देणार असल्याचे वचन जालन्यातून दिले.

यावेळी पुढे बोलतांना पटोले म्हणाले की, मराठवाडा विभागासाठी उपयुक्त असलेली मराठवाडा वॉटरग्रीड योजना पुर्ण करून या योजनेच्या माध्यमातून विभागातील प्रत्येक शहर आणि जिल्हयातील शेतकऱ्यांना पाणी देण्याचा प्रयत्न महाविकास आघाडी सरकारच्या काळात केला जाईल. शेतीवर आधारीत उद्योग उभे करून त्या माध्यमातून युवक, महिलांना रोजगार निर्मितीचा प्रयत्न देखील केला जाईल असे स्पष्ट करून शेतकऱ्यांना सरसकट कर्ज माफी देण्यासह लाडक्या बहिनींना प्रतिमहा ३ हजार, बेरोजगार तरूण, तरूणींना प्रतिमहा ४ हजार रूपये आणि सर्वसामान्य कुटूंबातील व्यक्तींना २५ लाख रूपयापर्यंत मोफत उपचारासह औषधी उपलब्ध करून देण्यात येईल अशी ग्वाही महाविकास आघाडीने आपल्या वचननाम्यात दिली आहे. याशिवाय राज्यात सद्या विविध सरकारी कार्यालयात सुरू असलेली कंत्राटी कर्मचारी भरतीची पध्दत बंद करून नियमित कर्मचारी भरती केले जाईल पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर पटोले यांनी टिकास्त्र सोडून या मंडळींनी शेतकऱ्यांच्या सोयाबिन, कपाशीसह इतर शेतपिकाला भाव मिळाला पाहिजे यासाठी कधीही ब्र शब्द काढला नाही. एकीकडे हिऱ्याच्या किंमती सहा महिन्याला वाढतात आणि कापूस सोयाबिनचे दर का? वाढत नाही असा सवाल उपस्थित करत भाववाढ तर दिली नाहीच उलट मागील दहा वर्षात शेतकऱ्यांच्या मालाचे भाव कमी करून शेतकऱ्यांना आथक अडचणीत आणण्याचे पाप केंद्र आणि राज्यातील भाजपा प्रणित सरकारने केल्याचा आरोप नानाभाऊ पटोले यांनी केला. महाराष्ट्राच्या तिजोरीत जीएसटीच्या रूपाने सर्वाधिक कर जालना जिल्ह्यातून जमा होतो. ही बाब लक्षात घेवून राज्यात मविआचे सरकार आल्यास जालना जिल्ह्याला भरीव निधी देण्यात येईल असे पटोले यांनी यावेळी सांगीतले. या सभेसाठी शहरातील चारही बाजूंनी पदाधिकारी कार्यकर्ते आणि समर्थकांनी ढोलताशांचा गजरात मिरवणूकीने येत सभेला हजेरी लावली. तत्पुर्वी शिवसेनेचे प्रदेश सचिव डॉ. संजय लाखे पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. निसार देशमुख, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, अखबर खॉ आदींनी आपल्या भाषणातून गोरंटयाल यांना विजयी करण्याचे आवाहन केले. संचलन राम सावंत यांनी तर शेवटी आभार विनोद यादव यांनी मानले.

**तर गोरंट्याल यांना मंत्री करू - पटोले**

विधी मंडळात आ. कैलास गोरंट्याल यांनी या मतदार संघाच्या विकासासंदर्भात अनेक प्रश्न मांडले आहे. गरज पडल्यास सरकारशी दोन हात करण्याची तयारी असणारा हा कर्मठ नेता असल्याने त्यांना पक्षाने यावेळी पुन्हा एकदा उमेदवारी देवून संधी दिली आहे. त्यांच्या प्रतिस्पध उमेदवारांनी काँग्रेस पक्षाच्या मतांचे विभाजन होण्याच्या दृष्टीने काही उमेदवार निवडणुकीत उभे केले आहे. मतांचे विभाजन करण्याचे हे षडयंत्र सर्वांनी मिळून हाणून पाडावे असे आवाहन नानाभाऊ पटोले यांनी यावेळी केले आहे. राज्यातील भ्रष्ट सरकार आणि गद्दारांना घरी बसवायचे असेल तर गोरंट्याल यांना एक लाख मतांनी विजयी करा असे सांगून तुमच्या मनातील गोरंट्याल यांना मंत्री करण्याचे स्वप्न पुर्ण करण्याची जबाबदारी आपली असल्याचे पटोले यांनी यावेळी स्पष्ट केले.

**सर्व सामान्यांसाठी संघर्ष करणारे गोरंट्याल यांच्या पाठीशी जनता- डॉ. खा. काळे**

जालन्यातील मविआचे उमेदवार आ. कैलास गोंरट्याल हे सर्व सामान्य जनतेसाठी सातत्याने संघर्ष करणारे नेते आहे. त्यामुळेच सामान्य जनतेचे पाठबळ आणि आशिर्वाद त्यांच्या पाठीशी असल्याचे खा. डॉ. कल्याण काळे यांनी सांगीतले. शहरातील पाणी प्रश्न असो, मेडिकल कॉलेजचा विषय असो की अन्य विकासांची कामे असोत गोरंट्याल यांनी नेहमीच सरकार विरोधात संघर्षाची भूमिका घेवून विकास कामे खेचून आणली आहे. एवढेच नव्हे तर ज्यांना गरज आहे अशा लोकांसाठी मनोरूग्णालय देखील त्यांनी मंजुर करून आणलेले आहे. मतदार संघा प्रती अत्यंत कर्तव्यदक्ष असणाऱ्या गोरंटयाल यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून त्यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करा असे आवाहन खा. काळे यांनी शेवटी केले.

**सत्ताधाऱ्यांकडून जाती-धर्मात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न - खा. चंद्रकांत हंडोरे**

जाती-धर्मात तेढ निर्माण करून संविधान संपवण्याचा प्रयत्न भाजपा व मित्र पक्षाकडून केला जात आहे. असा आरोप भिम शक्तीचे नेते खा. चंद्रकांत हंडोरे यांनी येथे बोलतांना केला. मविआचे उमेदवार आ. कैलास गोरंटयाल यांनी जालना मतदार संघातील अनेक प्रश्न माग लावले असून सर्वसामान्य घटकांसाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहे. शहरातील जनतेच्या जिव्हाळ्याचा पाणी प्रश्न माग लावतांनाच सामान्य कुटूंबातील गरजू विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षणाचे स्वप्न साकार करण्यासाठी मेडिकल कॉलेज देखील खेचून आणले आहे. त्यामुळे आगामी निवडणूकीत त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहून विजयी करण्याचे आवाहन हंडोरे यांनी यावेळी केले.

### ३०० कोटी आणल्याच्या केवळ थापा - गोरंट्याल

विकास कामांसाठी ३०० कोटी रूपये आणल्याचा दावा आपले प्रतिस्पर्धी करत असले तरी त्यासाठी शासनाकडून कवडीचीही आर्थिक तरतूद करण्यात आली नाही अशी टिका गोरंट्याल यांनी यावेळी केले. खडकपुर्णासह हातवण येथून पाणी आणण्याचा आपला माणस असून त्यासाठी मविआचे सरकार राज्यात आल्यास आपल्याला सरकारकडून पाठबळ मिळावे अशी अपेक्षा उमेदवार आ. कैलास गोरंट्याल यांनी यावेळी बोलतांना व्यक्त केली. खडकपुर्णा येथील पाणी आणल्यास त्याचा जालना मतदार संघातील ७२ गावांना आणि त्या गावातील शेतकऱ्यांना मोठा लाभ होणार आहे. तर भविष्यात शहराला दररोज पाणी पुरवठा करण्यासाठी नियोजन केले जात असून हातवण प्रकल्पातून पाणी पुरवठा करता आला तर दररोज पाणी पुरवठा करण्याचे स्वप्न साकार होईल. या दोन प्रश्नासह जालना येथे विद्यापिठाला मान्यता मिळावी याशिवाय आपल्याला दुसरे काही नाही दिले तरी चालेले असे सांगून कुंभकण झोपेत असणारे काही नेते निवडणूक जवळ येताच जागी झाले आहेत. दहा वर्ष राज्यमंत्री पदावर असतांना ज्यांना स्वतःच्या घराजवळचा नाला बांधता आला नाही ते मतदार संघाचा काय विकास करणार असा टोला शेवटी गोरंट्याल यांनी लगावला.

### घर बळकावणाऱ्यांना धडा शिकवा - अंबेकर

शिवसेनेने अनेकांची लायकी नसतांना देखील त्यांनी मंत्रीपदावर बसवले. मात्र, आज त्यांनीच गद्दारी करून शिवसेनेच्या चिन्हासह पक्ष पळवून नेल्याची टिका शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी यावेळी बोलतांना केली. येत्या २० तारखेला होत असलेली निवडणूक हे राजकीय युध्द असून विश्वास आणि अविश्वासाची निवडणूक आहे. घर सांभाळायला दिले तर घरच बळकावून बसणाऱ्यांना धडा शिकवायचा आहे. ही लढाई विश्वास आणि अविश्वासाची लढाई असल्यामुळे मविआच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी जागरूक राहून उमेदवार कैलास गोरंट्याल यांच्या विजयासाठी प्रयत्न करावे आवाहन शेवटी अंबेकर यांनी केले.

# महिला सुरक्षेसाठी २५,००० महिलांना पोलीस दलात समावेश करण्याचे वचन; महायुती सरकारचे आश्वासन - आमदार बबनराव लोणीकर

## वरफळ गावात अत्याधुनिक सोयीसुविधा असलेला शादी खाना उभारणार असल्याचे लोणीकर यांचे आश्वासन

**परतूर । प्रतिनिधी -** प्रत्येकास अन्न आणि निवारा प्रत्येक गरिबाला अन्न आणि निवारा देण्याचे महायुती चे असून वचन वृद्ध पेन्शनधारकांना महिन्याला १५०० वरून २१०० देणार असून जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती स्थिर होतील २५ लाख रोजगारनिर्मिती करून १० लाख विद्यार्थ्यांनादरमहा १०,००० रुपये विद्यावेतन महायुती सरकार देईल. या बरोबर च ४५,००० गावांत पांदण रस्ते बाधणार या सह अंगणवाडी आणि आशा सेविकांना महिन्याला १५,००० वेतन आणि विमा संरक्षण देणार असल्याचे प्रतिपादन देणार असल्याच प्रतिपादन परतूर विधानसभा मतदार संघाचे महायुती चे अधिकृत उमेदवार माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केले.

परतूर तालुक्यातील रंगोपंत टाकळी, लिंगसा, कान्हाळा, लिखित पिंपरी, आकोली, ब्राम्हणवाडी, रायगव्हाण, फुलवाडी, पळसी, आनंदगाव, हास्तूर तांडा, परतवाडी, सूरमगाव, श्रीष्टी तांडा या चौदा गावात आज दिनांक ०८ नोव्हेंबर २०२४ रोजी शुक्रवारी भारतीय जनता पार्टी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शिवसेना रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) रयत क्रांती संघटना महायुतीचे परतूर विधानसभा मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी मतदारांशी संपर्क साधून संवाद साधला यावेळी आयोजित जाहीर बैठकीत मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

या प्रसंगी आमदार बबनराव लोणीकर यांच्या समवेत सदरील दौऱ्यात भाजपा महाराष्ट्र प्रदेश निमंत्रित सदस्य माजी आमदार विलास बापू खरात, परतूर विधानसभा मतदारसंघाचे निरीक्षक आमदार संजय डीडी, भाजपा तालुका अध्यक्ष परतुर क्षत्रगुण कणसे, संपत टकले, संभाजीआप्पा वारे, रवी सोळंके, माजी सभापती माणिकराव वाघमारे, तुकाराम सोळंके, उद्धव गुंजाळ, नंदू गांजे, सिद्धेश्वर केकान, रंगनाथ येवले, बंकटराव सोळंके, काकासाहेब चौधरी, बाबाराव थोरात श्रीसर गांजाळे, मधुकर मोरे, नसरुल्ला काकड, गजानन लोणीकर, सिताराम राठोड, बाळासाहेब लहाने, अर्जुन राठोड, लक्ष्मण ठोंबरे यांची उपस्थिती.

या वेळी पुढे बोलतांना बबनराव लोणीकर म्हणाले की परतूर मतदारसंघातील तीनशे गावांना डांबरीकरणाचे रस्ते प्रत्येक गावात सिमेंट काँक्रिटीकरण चे रस्ते गावोगाव सांस्कृतिक सभागृह अनेक प्रशासकीय इमारती मागासवर्गीय मुलींसाठी परतुर व मंठा येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मुलींचे वस्तीगृह न्यायालयीन इमारती परतुर मंठा येथे भव्य क्रीडा संकुल यासह शेगाव पंढरपूर दिंडी मार्ग आरोग्याच्या सुविधा उपलब्ध हव्यात यासाठी परतुर व मंठा या दोन्ही ठिकाणी उपजिल्हा रुग्णालय अनेक ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र ३३ केव्ही १३२ केव्ही २२० केव्ही परतुर विधानसभा मतदारसंघात रस्त्याचा आणि विजेचे जाळ आपण



निर्माण केलं असल्याचं यावेळी आमदार लोणीकर यांनी आवर्जून नमूद केलं.

परतूर तालुक्यासाठी उपजिल्हा रुग्णालय (६० कोटी रु), वाटूर, आष्टी, श्रीष्टी व सातोना येथे प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी (२४ कोटी ८८ लाख) असा एकूण ८४ कोटी ८८ लक्ष रु निधी तर मंठा तालुक्यासाठी उपजिल्हा रुग्णालय (६० कोटी), दहिफळ खंदारे व ढोकसाळ या दोन प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी (१२ कोटी ४४ लक्ष), तर खोराड सावंगी व उस्वद प्राथमिक आरोग्य उपकेंद्रसाठी (१ कोटी १० लाख) असे एकूण ७३ कोटी ५४ लक्ष रु निधी. मतदारसंघात २ उपजिल्हा रुग्णालयासाठी १२० कोटी प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी ३७ कोटी ३२ लाख तर २ प्राथमिक आरोग्य उपकेंद्रासाठी १ कोटी १० लाख रुपये असा एकूण १५७ कोटी ४२ लक्ष रुपयांचा निधी आणला असल्याची माहिती दिली. मुख्यमंत्री लाडकी बहीण **पान ३ वर**

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.